महाराष्ट्र नागरी सेवा : वर्तणूक नियम १९७९ : प्रात्यक्षिक कार्य व सादरीकरण

(वेळ मर्यादा २० मिनिटे)

प्रशिक्षणार्थींना खालील उदाहरणे वितरित करुन प्रत्येक उदाहरणाबाबत कोणता नियम लागू होतो याबाबत चर्चा करावी व नियमानुसार योग्य कार्यवाही अपेक्षित आहे ते नमूद करण्यास सांगावे.

१. कर्मचाऱ्याने पूर्व परवानगी घेऊन नाटकात काम करणे सुरु केले. १२ ऑगस्ट रोजी विधानसभेचे कामकाज लांबल्यामुळे वरिष्ठांनी नाटकाचे प्रयोगास जाण्यास मज्जाव केला, तरी कर्मचारी प्रयोगासाठी कार्यालय सोडून गेला.

२. एका नियुक्ती प्राधिकाऱ्याने नेमणुकीची जाहिरात प्रसिद्ध केली व त्या नंतर त्या अधिकाऱ्याच्या पत्नीने उमेदवारांकडून निधी गोळा करणे सुरु केले.

३. एका अति वरिष्ठ अधिकाऱ्याला दारुच्या नशेत असताना रात्री १० वाजता पुणे महानगरपालिका जकात नाका, पुणे स्टेशन येथे जाऊन रोख रक्कम मोजण्याचा प्रयत्न केला. कर्मचाऱ्याने नकार दिल्यावर धुडगूस घातला.

४. कर्मचाऱ्याचा त्याचेवर अवलंब असणारा मुलगा बाँब स्फोटके हाताळताना पोलिसांना सापडला.

५. शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी विमा एजंट होती. सदर कर्मचारी रोखपाल असल्याने ऑफीसमधील कर्मचाऱ्याकडून प्रत्येकी दोन दोन पॉलिसी घेण्यासाठी दबाव आणला.

६. लेखाधिकारी (पणन) यांनी २००५ मध्ये State Bank of India रु. २५०००/- चे शेअर्स खरेदी केले व २०१५ सदर शेअर्स रु. १,००,०००/- रकमेस विकले.

७. अनुसुचित जातीच्या कर्मचाऱ्यांने त्याचे पदोन्नतीत झालेल्या अन्यायाबाबत आदिवासी विभागाच्या मंत्र्याकडे तक्रार केल्यामुळे नियुक्ती प्राधिकाऱ्याने कर्मचाऱ्यास दोन वेतनवाढी बाह्य दबाव आणला म्हणून थांबविल्या.

८. महिला कर्मचाऱ्यांशी अश्लील वागणुकीची चौकशी विशाखा समिती अध्यक्षांनी एकटीने पूर्ण करुन तो कर्मचारी निर्दोष असल्याचा अहवाल सादर केला.

९. कार्यालय प्रमुखाने एका वर्ग -४ च्या कर्मचाऱ्यास रात्री ०८ ते ०४ या वेळेत दादर चौपाटीवर पानाचे दुकान टाकण्यास परवानगी दिली.

१०. महानगरपालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने त्याच्या निवासस्थानी आलेल्या अत्यावस्थ रुग्णावर इस्पितळात न पाठविता घरीचा वैद्यकीय उपचार केले. व्यवसाय रोध भत्ता घेऊनही घरी

रुग्णास तपासून नियमांचा भंग केला. म्हणून शिस्तभंगाची कार्यवाही करुन दोन वेतनवाढी थांबविण्याची शिक्षा दिली.

११. ठेकेदारांकडून रु. ४०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडलेल्या कर्मचाऱ्याने सदर लाच नसून मी दोन महिन्यापूर्वी त्या ठेकेदारास रु. २००००/- उसने दिले होते. त्यापैकी काही रक्कमेची त्याने परतफेड केली. शिस्तभंग अधिकाऱ्याने हा युक्तीवाद मान्य करता खटला चालविण्याची परवानगी नाकारली.